महाराष्ट्र मुलकी सेवा
(सुधारित वेतन) नियम १९७८

विकल्प देण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक पी सी आर ११८०/१०९४/एसईआर-१०
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक २३ फेब्रुवारी १९८१.

CR1981022301

## प रि प त्र क

ज्या पदांना एस. एस. सी. पेक्षा कमी विहित शैक्षणिक सेवा प्रवेश अर्हता ठरविण्यात आली आहे अशी पदे धारण करणाऱ्या बहुसंख्य तृतीय व चतुर्थ श्रेणीतील शासकीय कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र मुलकी सेवा (सुधारित वेतन) नियम १९७८ मधील नियमांचा अचूक अभिप्रेत अर्थ न समजून घेता विकल्प दिला आहे. परिणामतः त्याच किंवा इतर विभागातील त्यांच्या सहव्यवसायी-पेक्षा अशा व्यक्ती कमी वेतन घेत आहेत. म्हणून शासनास असे निवेदन करण्यात आले आहे की, ज्यांनी अगोदरच विकल्प दिलेला आहे किंवा ज्यांनी विकल्प दिल्याचे गृहित धरण्यात आले आहे, अशा शासकीय कर्मचाऱ्यांना नवीन विकल्प द्यावयाची इच्छा आहे.

२. सदरहू प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार करुन शासन आता असा आदेश देत आहे की फक्त एस. एस. सी. पेक्षा कमी अशी विहित शैक्षणिक सेवाप्रवेश अर्हता धारण करणाऱ्या पदांच्या चतुर्थश्रेणी व अशीच विहित सेवा प्रवेश अर्हता धारण करणाऱ्या तृतीय श्रेणीतील शासकीय कर्मचाऱ्यांना; त्यांना आवश्यक वाटल्यास, महाराष्ट्र मुलकी सेवा (सुधारित वेतन) नियम १९७८ मधील नियम ६ व ७ शिथिल करुन ३१ मे १९८१ पूर्वी किंवा त्या तारखेस नवीन विकल्प देण्यास परवानगी देण्यात यावी. दिनांक ३१ मे १९८१ नंतर मात्र नवीन विकल्प देण्याची तारीख वाढविण्याबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

३. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना अशी विनंती करण्यात येते की हे आदेश संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करावे व त्यांच्याकडून अचूक सुधारित विकल्प घेण्यात यावेत.

सरला पंडित,
उप सचिव महाराष्ट्र शासन.

प्रत रवाना :-

महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपूर,
लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,

कृ. मा. प.

शामसु. रोट१/वि वि १ (एच-११४३(८०००+-५-२-८१)

उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
मंत्री आणि राज्य मंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
मंत्रालयाच्या सर्व विभागातील विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख,
लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद,
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, वित्त विभाग, एसईआर-१०.

---

* पत्राव्दारे.

१९८१ चा क्रमांक
माहिती व मार्गदर्शनाकरिता प्रत रवाना.

---

क्र. ले १/११०५ लेसी
पुणे दिनांक १२।१९८१

प्रत- सर्व उपसंचालक, भूमि अभिलेख यांचेकडे माहिती प्रतीसह माहिती व कार्यवाहीसाठी.

स्रौ. वि. जोशी
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख म. राज्य पुणे यांचे करितां.

प्रत- कार्यासन अधिकारी ले २/३, ई १, २, ३, ४, ५ / अभिलेखापाल.

W.S. 937

ले/२०.३
एच-११४३(८०००+५-२-८१)